संस्थापक-नाट्याचार्य कृष्णाजी प्रभाकर खाडिलकर

संपादकीय

नवाकाळ

।। न मे भक्त प्रणश्यति ।।

हा तर आभासी दुनियेचा टाईमबॉम्ब

संपूर्ण मानवी जीवनाचा अनिवार्य आणि अविभाज्य असलेले तंत्रज्ञानाचे धोके आता वारंवार पुढे येऊ लागले आहेत. तंत्रज्ञान आत्मसात करण्यासाठी शिक्षण किंवा त्याबाबतचे ज्ञान जरी आवश्यक असले तरी तंत्रज्ञानाविषयीचे हे ज्ञान एकूण समाजव्यवस्थेलाच धोकादायक वळणावर घेऊन जाते आहे. प्रचंड वेगाने विकसित होणाऱ्या या प्रकाराशी समाजातला प्रत्येक घटक स्पर्धा करू शकत नाही किंवा ते आत्मसातही करू शकत नाही. मात्र अशा वेगातून त्याची होणारी फरफट धक्कादायक म्हणावी लागते. विद्येचे माहेरघर आणि सांस्कृतिक महानगरी म्हणूनही ओळखल्या जाणाऱ्या पुणे शहरात अलिकडेच एक सर्वेक्षण पार पडले. ज्यामध्ये शालेय स्तरावर विद्यार्थ्यांकडून प्रचंड प्रमाणात वापरल्या जाणाऱ्या मोबाईल आणि कॉम्प्युटरचे जेनेक दुष्परिणाम निदर्शनास आले. काही दिवसांपूर्वीच एका शाळकरी मुलाने आपल्याच मित्रावर चाकूहल्ला करण्याचाही प्रकार घडला होता. असे एकच प्रकार नाही तर वेगवेगळ्या स्वरूपात साधारणपणे पाचवी ते दहावीपर्यंतच्या विद्यार्थ्यांच्या मानसिकतेला हे तंत्रज्ञान चांगलेच वेठीला धरते आहे. पुण्यातल्याच अनेक मानसोपचार तज्ज्ञांच्या म्हणण्याप्रमाणे या वयोगटातील मुलांची विस्कळीत होत असलेली मानसिकता त्यांना हिंसक, क्रूर किंवा बेफिकीर बनवते आहे. अशा विद्यार्थ्यांचे प्रमाण आज जरी पाच ते पंचवीस टक्क्यांच्या दरम्यान असले तरीसुद्धा भविष्यकाळात त्याचे प्रमाण वाढू शकते. आणि त्याचा सर्वाधिक त्रास त्या त्या कुटुंबाला होऊ शकतो. यासाठीच पुण्यातल्या अनेक तज्ज्ञांनी मुलांच्या स्क्रीन टाईमवर नियंत्रण ठेवण्याचा सल्ला दिला आहे. ज्या प्रमाणात विद्यार्थी किंवा या वयोगटातली मुले मोबाईल किंवा कॉम्प्युटरच्या स्क्रीनवर असतात. त्याचा खूप मोठा परिणाम त्यांच्या मनोवृत्तीवर होताना दिसतो आहे. तो जर वेळीच नियंत्रणात आणला नाही तर तो एखाद्या टाईमबॉम्बसारखा असू शकतो. असाच त्याचा निष्कर्ष म्हणावा लागेल. खरे तर आता हा काही धोक्याचा इशाराही म्हणता येणार नाही. धोक्याची पातळीदेखील या प्रकारांनी ओलांडलेली दिसते. आता अशा विद्यार्थ्यांचे किंवा त्या वयोगटातील मुलांसाठी बचाव कार्यच युद्ध पातळीवर सुरू झाले पाहिजे.

पालकांकडून दुर्लक्ष

पुणे महानगरात झालेल्या या सर्वेक्षणाप्रमाणे शहर आणि ग्रामीण भागात अल्पवयीन मुलांकडून होणाऱ्या दखलपात्र गुन्ह्यांच्या संख्येत मोठी वाढ होताना दिसते. २०२२-२३ मध्ये पुणे शहर परिसरात अशा गुन्ह्यांच्या २४८ घटना घडल्या. तर ग्रामीण भागामध्ये हे प्रमाण १०४ एवढे होते. राष्ट्रीय गुन्हे नोंदणी अहवालातच ही आकडेवारी दिल्याने त्याबद्दल शंका घेण्याचे कारण राहत नाही. वाढत्या नागरीकरणाचे हे जरी काही प्रमाणात परिणाम असले तरीसुद्धा त्याला तेवढेच एक कारण पुरेसे ठरत नाही. उलट तज्ज्ञांचा एकमुखी सल्ला म्हणजे कुटुंबाकडूनच या मुलांकडे दुर्लक्ष होते आहे. आपला मुलगा मोबाईल किंवा कॉम्प्युटरच्या स्क्रीनवर किती वेळ घालवतो याकडे पालकांचे लक्ष नाही. मोबाईल आणि इंटरनेटच्या माध्यमातून सर्वाधिक अनिष्ट गोष्टी या मुलांकडून पाहिल्या जातात. नोकरीनिमित्त बाहेर असणारे पालक या मुलांवर लक्ष ठेवू शकत नसले तरी उपलब्ध काळात ते आपल्या मुलांसाठी किती वेळ देतात. हा त्यातला सर्वात मोठा प्रश्न आहे. कारण दिवसभर घरी असणारे पालक घरी आल्यानंतरसुद्धा मुलांशी नीट संवाद साधू शकत नाहीत. कारण स्वतः तेही आणि मुलेही स्क्रीनवर असतात. परिणामी मुलांशी या वयात आवश्यक असलेला संवाद घडून येत नाही. कौटुंबिक वातावरणापेक्षाही स्क्रीनवरच्या आभासी दुनियेचा त्यांच्यावर अधिक प्रभाव पडतो आणि तीच खरी दुनिया मानून ते आपली किमयाही दाखवायला लागतात. मग अगदी घरात आईवडिलांशी उद्धटपणे वागण्यापासून ते शाळांमध्ये आपल्यापेक्षा वयाने लहान असलेल्या मुलांसोबत दादागिरी करण्यापर्यंतचे प्रकार घडतात. ज्या काळात मुलांच्या भवितव्याला योग्य तो आकार देण्याची आवश्यकता असते, त्याच काळामध्ये या आभासी दुनियेच्या विकारांचे शिकार ते होताना दिसतात. स्वाभाविकपणे मुलांशी संवाद वाढवणे त्यांचा स्क्रीनवरचा वेळ जवळपास संपुष्टात आणणे, असे प्रयत्न पालकांनी केले पाहिजेत. म्हणजेच स्क्रीनला पर्याय ठरणाऱ्या, परंतु मुलांच्या मनाला आणि बुद्धीला चालना देऊन उत्साह वाढवणाऱ्या पर्यायी गोष्टींचा पालकांनी शोध घेतला पाहिजे.

शाळांमधूनही संवाद हवा

यासोबतच दिवसभरातला पाच ते सहा तास शाळेत असणारा हा विद्यार्थी शिक्षकांकडूनही दुर्लक्षित होता कामा नये. ज्या शाळांमधून मूल्य शिक्षणाचे धडे दिले जातात. परंतु तो प्रकार केवळ शालेय अभ्यासाचाच भाग राहून जातो. त्यातून मनाची जडणघडण किंवा संस्कार असे काहीही होऊ शकलेले नाही. याच तज्ज्ञांच्या म्हणण्याप्रमाणे शाळाशाळांमध्येयेसुद्धा शिक्षकांनी अभ्यासाबरोबरच इतर उपक्रमांमधून मुलांशी संवाद साधण्याची आवश्यकता आहे. यासाठी पालकांचे सहकार्य घेणे, मुलांच्या अभ्यासाबरोबरच त्यांच्या सवर्यीविषयी चर्चा करणे आवश्यक ठरणार आहे. म्हणजेच वेगाने विकसित होणारे हे तंत्रज्ञान जीवनाचे वास्तव ज्ञान देण्यापेक्षाही फसव्या किंवा आभासी जीवनाचे कारण ठरू पाहत आहे. ही समस्या हाताबाहेर जाऊ द्यायची नसेल तर सरकारी पातळीवरसुद्धा याचा विचार व्हावा लागेल. समाज स्वास्थ्य आणि व्यवस्थेसाठी ही बाबदेखील गरजेची ठरते. अन्यथा आभासी दुनियेचा हा टाईमबॉम्ब या मुलांच्या भविष्यकाळासाठी कसा आणि किती स्फोटक ठरेल हे सांगता येत नाही. आता तर आर्टिफिशिअल इंटिलिजन्स हा प्रकार शिक्षण व्यवस्थेतसुद्धा येऊ घातला आहे. त्याचा उपयोग करून समाजातल्या अनेक क्षेत्रांचे आभासी चित्र उभे करता येऊ शकते. काही क्षेत्रांसाठी हे कृत्रिम बुद्धीमत्तेचे तंत्रज्ञान उपयोगी ठरणार असले तरीसुद्धा त्याचा गैरवापर होण्याची शक्यता तितकीच मोठी आहे. अशा या सीमारेषेवर अधिक जागरुक राहणे गरजेचे ठरते.

सुविचार विलास कोळेकर
खंडाळा, रत्नागिरी. मोबा.९४२२४२०६११

प्रत्येकाचे स्वतःचे अस्तित्व आहे, सूर्यासमोर दिवा लहान वाटतो, पण अंधारासमोर तो तेजस्वी भासतो.

पंचांग बुधवार ७ फेब्रुवारी २०२४
शक १९४५ शोभननामसंवत्सर

पौष कृष्ण द्वादशी
नक्षत्र : पूर्वाषाढा

रवी उदय- ०७-१२
रवी अस्त- १८-३४

-: जन्मराशी :-
००-०१ ते २४-०० धनु

प्रदोष; श्री गगनगिरी महाराज पुण्यतिथी, गगनगड

मुद्रक, प्रकाशक **सौ. जयश्री रामकांत खाडिलकर-पांडे** यांनी हे दैनिक नवाकाळ ऑफीस आणि नवाकाळ प्रेस करिता दंगट मीडिया प्रा.लि., पत्ता: प्लॉट नं. २२, दिघा एमआयडीसी, टीटीसी इंडस्ट्रीयल एरीया, विष्णू नगर, दिघा, नवी मुंबई -४००७०८ येथे छापून घेतले व नवाकाळ बिल्डिंग, १३ नवाकाळ पथ, खाडीलकर रोड, गिरगांव, मुंबई -४००००४ येथे प्रसिद्ध केले.
संपादक : **रोहित रमाकांत पांडे**

संपर्क : संपादक विभाग: ८६५२२०१४४०,
जाहिरात विभाग : ८१०८१११६४२९, ८१०८१११६४२९,
छोट्या जाहिराती: ८४२२८१७४४५. वितरण विभाग : ९५९४९३६४४१
ई-मेल navakal.1923@gmail.com
'नवाकाळ ऑफिस व नवाकाळ प्रेस'चे प्रकाशन दैनिक 'नवाकाळ' आर.एन.आय.क्र.१८७४/५७
REGD. No. MH/MR/SOUTH-143/2012-14
स्थापना ७ मार्च १९२३/ फाल्गुन वद्य ५ शके १८४४

Printed and Published by **Jayshree Ramakant Khadilkar-Pande** On behalf of Navakal Office And Navakal Press. Printed at Dangat Media Pvt. Ltd., Address : Plot No.22, Digha M.I.D.C., TTC Industrial Area, Vishnu Nagar, Digha, Navi Mumbai - 400 708. Published at Navakal Building, 13 Navakal Path, Khadilkar Road, Girgaum, Mumbai - 400 004.
Editor - **Rohit Ramakant Pande**

कविता...
त्यागमूर्ती रमा



पतीसाठी जीवनाची कथी केली ना तमा
त्यागाची मूर्ती स्फुर्ती होती
माऊली रमा ।।धृ.।।

घरदार संसाराचा समर्थ पणाने
भार वाहिला तो शिरी भारी हिमतीने
सुख दुःख अडचणी त्या
सांगितल्या ना भिमा ।।१।।

हौसमौज दागिन्यांची आस नाही केली
पतीसुखासाठी जीवनी साधीच राहिली
मनातील यातना त्या
केल्या डोळ्यात जमा ।।२।।

बॅरिस्टराची पत्नी असूनी रमाई
शेणी गोवऱ्या थापूनी विकण्यास जाई
घरखर्चासाठी पैसा
येण्यास कामा ।।३।।

अशी गुणवाण प्रेमळ होती रमाई
म्हणूनी हा बबन बंधू तिचे गुण गाई
चुकल्यामाकल्यांना सहारा
देई करी ती क्षमा ।।४।।

● बबन फणसाळकर ●
वडाळा (पूर्व), मुंबई- ४०००३७
मो. ७६६७७३८७७ / ७०३९७५८२६३

तिसऱ्या वनडेत विंडीजचा अवघ्या ८६ धावांत खुर्दा
ऑस्ट्रेलियाकडून वेस्ट इंडिजला ३-० ने क्लीन स्वीप

सध्या विंडीज दौऱ्यावर असलेल्या ऑस्ट्रेलियाला कसोटी मालिका जिंकण्यात यश आले नाही, पण ३ सामन्यांच्या एकदिवशीय मालिकेत ऑस्ट्रेलियाने तिन्ही सामने जिंकून विंडीजला क्लीन स्वीप दिली आहे. तिसऱ्या सामन्यात तर ऑस्ट्रेलियाने विंडीजला अवघ्या ८६ धावांमध्ये गुंडाळले व केवळ ६.५ षटकात ८ गडी राखून विजय मिळवला. ऑस्ट्रेलियाच्या बार्टलेटणे २१ धावांत ४ बळी घेतले. विंडीजकडून केवळ अथांजेने ३२ धावा केल्या.

■ बार्बाडोस

ऑस्ट्रेलिया विरुद्ध वेस्ट इंडिज यांच्यातील तिसऱ्या एकदिवशीय सामन्यात ऑस्ट्रेलियाने नाणेफेक जिंकून विंडीजला प्रथम फलंदाजी दिली. विंडीजची सुरुवात अत्यंत खराब झाली. सलामीवीर ओटलीला बार्टलेटणे १३ धावांवर पायचीत केले. कारटीला मोरीसने १० धावांवर माघारी धाडले. कर्णधार साई होप याला अबोटने ४ धावांवर बाद केले तर विशपला मोरीशने खातेही उघडायला दिले नाही. चेस १२ धावा काढून तंबूत परतला. त्याला बार्टलेटणे बाद केले.

पाठोपाठ त्याने शेपर्डलाही अवघ्या १ धावेवर तंबूचा रस्ता दाखवला. त्यानंतर एका बाजूने सावधपणे किल्ला लढवणाऱ्या सलामीवीर अथांजेचा अडसर एडम जपाने दूर केला. त्याने सर्वाधिक ३२ धावा केल्या. जोसेप केवळ ६ धावाच करू शकला. त्याला बार्टलेटणे बाद केले. मोटी शून्यावर बाद झाला तर थोमासला एकही धाव न करता नाबाद राहिला. अशा तऱ्हेने ऑस्ट्रेलियाच्या भेदक माऱ्यासमोर विंडीजचा २४.१ षटकात ८६ धावांवर खुर्दा उडाला. दरम्यान ऑस्ट्रेलियासमोर अत्यंत छोटे लक्ष असल्याने त्यांनी अवघ्या २ गड्यांच्या मोबदल्यात विजयी लक्ष गाठले. ऑस्ट्रेलियाचे सलामीवीर मेकगुर्क ४१ व इंग्लिश ३५ यांनी ६७ धावांची सलामी देवून ऑस्ट्रेलियाला विजयाच्या उंबरठ्यावर नेवून ठेवले. त्यानंतर हार्डी व स्मिथ यांनी विजयासाठी लागणाऱ्या २० धावा करून विंडीजवर ८ गाडी राखून विजय मिळवला व तिसऱ्या वनडे सह मालिकाही ३-० ने जिंकली.

आंतरशालेय मिनी मॅरेथॉन स्पर्धेत जोगेश्वरीतील अस्मिता शाळेची बाजी

■ मुंबई

जोगेश्वरी (पूर्व) येथील संजय स्पोर्ट्स ॲकेडमीतर्फे रविवार, ४ फेब्रुवारी रोजी सकाळी ७ वाजता जोगेश्वरी विभागातील शाळांमधील विद्यार्थ्यांसाठी १७ वी जोगेश्वरी मिनी मॅरथॉन स्पर्धा आयोजित करण्यात आली होती. या स्पर्धेत जोगेश्वरीतील अस्मिता शाळेने विजेतेपद पटकावले. या स्पर्धेचे उद्घाटन महेश गिरमे (जोगेश्वरी वाहतूक विभागाचे सीनियर),

(पोलीस निरीक्षक) यांच्या हस्ते झेंडे दाखवून करण्यात आले. या स्पर्धेला इंडियन ऑईलने स्पॉन्सरशिप दिली होती. प्रत्येक गटात प्रथम दहा स्पर्धकांना विशेष प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात आले. प्रथम ३ स्पर्धकांना मेडल, ट्रॉफी, रोख रक्कम, आणि प्रशस्तीपत्रक देऊन गौरविण्यात आले. प्रत्येक गटात प्रथम दहा स्पर्धकांना मेडल आणि विशेष प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात आले. या स्पर्धेला प्रमुख पाहुणे म्हणून करण नागपाल, डॉ. प्रमोद कामत, डॉ. प्रकाश पवार, युवराज पाटील सर यांची उपस्थिती होती. या प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते विजेत्यांचा सत्कार करण्यात आला. हा उपक्रम संजय स्पोर्ट्स ॲकेडमीचे अध्यक्ष संजय चिंदरकर गेली १७ वर्षे राबवत आहेत.

पनवेल महानगरपालिका
शहर अभियंता विभाग
ई-निविदा सूचना

निविदा सुचना क्र. पमपा/बांधकाम/ २०२४/प्र.क्र.०१/४०९ /२०२४ — दिनांक : ०६/०२/२०२४

आयुक्त, पनवेल महानगरपालिका खालील नमूद कामाकरीता सार्वजनिक बांधकाम विभाग, केंद्रीय सार्वजनिक बांधकाम विभाग, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, सिडको इत्यादी शासकीय/निम शासकीय (Central Government / State Government / Government under taking) विभागात खालील कामासाठी पात्र अनुभवी ठेकेदारांकडून बी-१ श्रेणीत पध्दतीनुसार ई-निविदा मागवित आहेत.

अ. क्र.	निविदा क्र.	कामाचे नाव	निविदा रक्कम रु. (Without GST)
१.	PMC/CE/२८१/ २०२३-२४	पनवेल महानगरपालिका हद्दीतील प्रभाग समिती - ब, कळंबोली नोड मधील IDBI बँक, सेक्टर- ८ ते सन झाईन मोषायटी पर्यंत रस्त्याचे काँक्रीटीकरण करणे	९,००,३१,६३९/-
२.	PMC/CE/२८२/ २०२३-२४	पनवेल महानगरपालिका हद्दीतील प्रभाग समिती- ब, कळंबोली नोड मधील अंतर्गत डांबरी रस्त्याचे पुर्नपृष्टीकरण करणे.	१६,५१,१०,२०८/-
३.	PMC/CE/२८३/ २०२३-२४	पनवेल महानगरपालिका हद्दीतील प्रभाग समिती- क मधील कामोठे नोड मधील अंतर्गत डांबरी रस्त्याचे पुर्नपृष्टीकरण करणे व इतर अनुषंगिक कामे करणे	२२,६४,७०,३६०/-
४.	PMC/CE/२८४/ २०२३-२४	पनवेल महानगरपालिका हद्दीतील प्रभाग समिती- अ मधील खारघर नोड मधील अंतर्गत डांबरी रस्त्याचे पुर्नपृष्टीकरण करणे.	३२,९४,०५,४१९/-
५.	PMC/CE/२८५/ २०२३-२४	पनवेल महानगरपालिका हद्दीतील प्रभाग समिती - अ, प्रभाग क्र.२ मधील तोंडरे गाव येथे पाण्याच्या टाकी पासून ते हनुमान मंदिरपर्यंत पावसाळी गटार व रस्त्याचे काँक्रीटीकरण करणे.	२५,१४,७९,९५४/-
६.	PMC/CE/२८६/ २०२३-२४	पनवेल महानगरपालिका हद्दीतील प्रभाग समिती ब व ड येथील अंतर्गत रस्त्याचे डांबरीकरण व इतर अनुषंगिक कामे करणे.	२५,१७,३८,०४१/-
७.	PMC/CE/२९५/ २०२३-२४	पनवेल महानगपालिका हद्दीतील प्रभाग समिती मधील पनवेल शहरातील रस्त्याचे काँक्रीटीकरण करणे व इतर अनुषंगिक कामे करणे.	२५,००,२६,६३३/-

या कामाच्या ई-निविदेच्या शुध्दीपत्रक क्र. २ बाबतची माहिती शासन 'http://mahatenders.gov.in' या संकेतस्थळावर दि. ०७/०२/२०२४ रोजी प्रसिध्द करण्यात येईल. संबंधित निविदाधारकांनी याची नोंद घ्यावी.

सही/-
(डॉ. प्रशांत रसाळ)
अतिरिक्त आयुक्त-I
पनवेल महानगरपालिका

जाहीर सूचना

जॉर्ज ध्यानी वी, सर्वप्रथम दिनांक सौ. स्वाती राधव नायर ("मूळ मालक") यांनी गाव पहाडी गोरेगाव, प्रभात नगर, उच्चत नगर २, गोरेगाव (पश्चिम), मुंबई - ४०००७४ येथे स्थित असलेल्या आणि वसलेल्या सीटीएस क्र. ५०६ (भाग) वारण केलेल्या "जोकबार हॅबिलाश सीएचएसएल" या इमारतीमधील ६ व्या मजल्यावरील सदनिका क्र. बी-६०१, मोजमाप ६०३ सी.एफ. बिल्ट अप बोअरफल ("संबंधित मालमत्ता") दिनांक ०६.०८.२०१० रोजीच्या नोंदणीकृत करारपत्राद्वारे संपादित केली होती. सदर सौ. स्वाती राधव नायर यांच्या निधनानंतर, संबंधित मालमत्ता श्री. योगेश राधव नायर (दिवंगत सौ. स्वाती राधव नायर यांचे कायदेशीर वारस) यांच्याद्वारे बनविलेल्या, नोंदणीकृत क्र. बीआरएल-१-२४७४-२०२० वारण केलेल्या दिनांक ०२ मार्च, २०२० रोजीच्या नोंदणीकृत हक्कपत्रीय करारनाम्याद्वारे श्री. गिरिश राधव नायर यांच्या नावे सोडण्यात आली आणि त्यानुसार श्री. गिरिश राधव नायर हे सदर संबंधित मालमत्तेचे विद्यमान मालक आहेत.

सदर मालमत्ता, किंवा रिक्त्या कोणत्याही भाग/भागांमध्ये किंवा करिता धिवी, अटलाबदल, भेट, भोषेष्ठी, भाडेकरू, परवाना, महाहक्क, प्रभार, वारसाधिकार, न्यास, वारसा, हुकुम, वहीवाट, हक्क, लाभक्रम, मालकी, देखभाल, ताबेकब्जा करार, विकास अधिकार, विक्रीचा करार किंवा अन्य कशाही कोणत्याही मार्गे कोणताही हक्क, शीर्षक, हितसंबंध, लाभ, दावा किंवा कोणत्याही स्वरुपाची मागणी असणाऱ्या सर्व व्यक्तींनी त्याबाबत लेखी स्वरुपात, त्याच्या समर्थनार्थ कागदोपत्री पुराव्यासह, निम्नस्वाक्षरीकार यांना पी.जी.क्र. दुसरा क्र. ४, शीतल मेघा कुटीर, पोहार रोड, गोल मैदानसमोर, मालाड (पूर्व), मुंबई-४०००९७ येथे जाहत्या दिनांकापासून १५ (पंधरा) दिवसांच्या आत सूचित करावे, अन्यथा असे गाजण्यात येईल की, अशा सर्व व्यक्तींनी सदर मालमत्तेमधील त्यांचे कोणतेही आणि सर्व स्वरुपाचे दावे, हक्क, हितसंबंध आणि शीर्षक समर्पित केले आहेत आणि जुंबाकून ठेवले आहेत आणि सदर मालमत्तेमध्ये कोणत्याही स्वरुपाचा दावा, हक्क, शीर्षक किंवा हितसंबंध शिल्लक नाही.

दिनांक ०७ फेब्रुवारी, २०२४
आर. जैन ॲण्ड कं. - ॲडव्होकेट
दुकान क्र. ४, शीतल मेघा कुटीर, पोहार रोड, गोल मैदानसमोर, मालाड (पूर्व), मुंबई-४०००९७

प्रतिभा इंडस्ट्रीज लिमिटेड (परिसमापनामध्ये)
परिसमापक म्हणून - १७६, १ ला मजला, कनविजा ॲट्रियम ६, क्रॉस रोड ए, कोर्टयार्ड मॅरियटच्या मागे, चकाला, अंधेरी पूर्व, मुंबई - ४०००९३.
संपर्क: +६१ १३५७०८१२८. ईमेल: liquidator.pratibha@gmail.com

ई-लिलाव - आयबीसी, २०१६ अन्वये संपत्तीची विक्री
लिलावाचा दिनांक आणि वेळ: दि. ५ मार्च, २०२४ (मंगळवार) दु. १२.०० ते दु. ०३.०० वा.
(प्रत्येकी ५ मिनिटांच्या अमर्यादित विस्तारासह)

परिसमापन प्रक्रिया विनियमनाच्या विनियमन ३३ सह वाचावयाचा आयबीसी, २०१६, च्या कलम ३५(१एफ) अन्वये परिसमापन संपत्ती भाग बनलेल्या **प्रतिभा इंडस्ट्रीज लिमिटेड** (परिसमापनामध्ये) च्या संपत्तीची विक्री. ई-लिलाव **"जसे आहे जेथे आहे, जसे आहे जे आहे आणि कोणत्याही आधारशिवाय तत्त्वावर"** आयोजित करण्यात येईल.

निम्नस्वाक्षरीकारांद्वारे विक्री ई-लिलाव सेवा पुरवठादार नॅशनल ई-गव्हर्नन्स सर्व्हिसेस लिमिटेड यांच्या मार्फत वेबसाईट https://www.pda.nesl.co.in मार्गे करण्यात येईल.

(रक्कम भारतीय रुपयांमध्ये)

अ. क्र.	संपत्तीचा तपशील	राखीव किंमत	ईएमडी रक्कम	विस्तारयोग्य बोली रक्कम
अ.	**पर्याय अ: कॉर्पोरेट ऋणकोची गोईंग कन्सर्न म्हणून विक्री** **लिलावाचा दिनांक आणि वेळ: ५ मार्च, २०२४ (मंगळवार) रोजी दु. १२.०० ते दु. ०१.००**			
१.	कॉर्पोरेट ऋणकोची गोईंग कन्सर्न म्हणून विक्री (त्याचा केलेली संपत्ती, चालू आणि आकस्मी कायदेशीर/सवाद प्रकरणी)	६५,००,००,०००	६,५०,००,०००	५०,००,०००
ब.	**पर्याय ब: पार्श्वस्तरूपाची मालमत्तांची विक्री** **लिलावाचा दिनांक आणि वेळ: ५ मार्च, २०२४ (मंगळवार) रोजी दु. ०२.०० ते दु. ०३.००**			
१.	५१५ ते ५१६, ५वा मजला, श्रीकांत चैम्बर्स, स. क्र. ७८/१ आणि ७९ (भाग), सीटीएस क्र. ६६९/१ ते ६, आणि ७८३ (भाग), बोरला गाव, सायन ट्रॉम्बे रोड, देवनार, मुंबई.	२,४०,००,०००	२४,००,०००	१०,००,०००
२.	रायकिना इन, ५०१, प्लॉट क्र. ५७४, उषा कमल, टॉलमॅन (एसबीआय मार्ग), पेबूर नगर, मुंबई ४०००७१.	२,०५,००,०००	२०,५०,०००	१०,००,०००
३.	प्लान्ट आणि मशिनरी (टनेल बोरिंग मशीन ३ आ आणि इतर)	३१,५०,००,०००	३,१५,००,०००	२५,००,०००
४.	मुंबई येथे स्थित वाहने	१,५८,००,०००	१५,८०,०००	१०,००,०००
५.	दिल्ली येथे स्थित वाहने	२१,००,०००	२,१०,०००	५०,०००

लिलाव प्रक्रियेकरिता टिप्पा:
- प्रत्येक पर्याय/लॉटकरिता ईएमडी सादर केल्यावर सर्व दोन्ही पर्यायांमध्ये बोली लावता येईल.
- जर पर्याय ब ऑक्शन उच्चतम बोलीदाराने वरील मुद्यांमध्ये नमूद केल्याप्रमाणे बोली मूल्य प्रस्तावित केल्यास, पर्याय अ ऑक्शन (पर्याय बीमोदार यांस सरकारी सीमित करण्यात येईल आणि पर्याय ब ऑक्शन हे लिलाव रद्द समजला जाईल. अन्यथा पर्याय ब मधील प्रत्येक लॉटचे उच्चतम बोलीदार यांसही बोलीदार म्हणून घोषित करण्यात येतील.

बोली कागदपत्रांचा सादरीकरणाकरिता अंतिम दिनांक — दि. २१ फेब्रुवारी, २०२४ (बुधवार)
पहाणीचा अंतिम दिनांक — दि. २१ फेब्रुवारी, २०२४ (गुरुवार)
ईएमडी सादरीकरणाकरीता अंतिम दिनांक — दि. २ मार्च, २०२४ (शनिवार)
रोखी सायं. ५.०० वाजेपर्यंत
ई-लिलावाचा दिनांक आणि वेळ — दि. ५ मार्च, २०२४ (मंगळवार) (दु. १२.०० ते दु. ०३.०० दरम्यान)

टीप : ऑक्शनईन लिलाव विक्रीच्या तपशीलवार अटी आणि शर्ती, ई-लिलाव बोली कागदपत्र, उद्घोषणा आणि इतर तपशील http://pda.nesl.co.in वर आणि प्रतिभा इंडस्ट्रीज लिमिटेडची वेबसाईट https://www.pratibhagroup.com वर उपलब्ध आहेत.

कोणत्याही स्पष्टीकरणाकरिता, कृपया निम्नस्वाक्षरीकारांना liquidator.pratibha@gmail.com येथे संपर्क साधावा.

अनिल मेनेझेस
प्रतिभा इंडस्ट्रीज लिमिटेडचे परिसमापक म्हणून
नियुक्तीकरिता प्राधिकृतता दि. १७ नोव्हेंबर, २०१४ पर्यंत वैध
नोंदणीकरण क्र. IBBI/IPA-001/IP-P00017/2016-17110041
नोंदणीकृत पत्ता: १७६, १ ला मजला, कनविजा ॲट्रियम ६,
क्रॉस रोड ए, कोर्टयार्ड मॅरियटच्या मागे,
चकाला, अंधेरी पूर्व, मुंबई - ४०००९३.
ईमेल: liquidator.pratibha@gmail.com

दिनांक: ७ फेब्रुवारी, २०२४
ठिकाण: मुंबई

फॉर्म ए
जाहीर उद्घोषणा
(भारतीय नादारी आणि दिवाळखोरीपणा मंडळ (कॉर्पोरेट व्यक्तींकरिता दिवाळखोरी दरम्यान प्रक्रिया) विनियमन, २०१६ च्या विनियमन ६ अन्वये)

मे. जेएमएस लॉजिस्टिक्स ॲण्ड एक्सप्रेस प्रायव्हेट लिमिटेडच्या धनकोंचे लक्ष वेधण्याकरिता

संबंधित तपशील

१.	कॉर्पोरेट कर्जदाराचे नाव	मे. जेएमएस लॉजिस्टिक्स ॲण्ड एक्सप्रेस प्रायव्हेट लिमिटेड
२.	कॉर्पोरेट कर्जदाराच्या स्थापनेचा दिनांक	३०.०७.२०१४
३.	प्राधिकरण ज्या अंतर्गत कॉर्पोरेट कर्जदाराची स्थापना/नोंदणीकरण झाली	कंपनी निबंधक, मुंबई
४.	कॉर्पोरेट कर्जदाराचा कॉर्पोरेट ओळख क्र./मर्यादित दायित्व ओळख क्र.	U64204MH2014PTC256722
५.	कॉर्पोरेट कर्जदाराचा नोंदणीकृत कार्यालयाचा आणि प्रमुख प्रशासनिक कार्यालयाचा पत्ता, जर असल्यास	इझान २८, ओलंपर इंस्टेट, शशिकल, बोरीवली पूर्व, मुंबई शहर, मुंबई, महाराष्ट्र-४०००६६, भारत
६.	कॉर्पोरेट कर्जदाराच्या संस्थेत दिवाळखोरी सुरु होण्याचा दिनांक	०६.०५.२०२३ (निर्णय २१.०२.२०२४ रोजीच्या आदेशानुसार आदेशाची प्रतवारी आणि अनिवार्यपणे सदर आदेशाची नमूनेदार विनंतुला करण्याचा उपाय आणि तारीख दि. ०१.०२.२०२४ रोजी वाचावियास आली होती.)
७.	दिवाळखोरी सुरु प्रक्रिया परिसमापनीय अंतिम दिनांक	०४.१२.२०२४ (दिवाळखोरी सुरु होण्याच्या दिनांकापासून १८० दिवस)
८.	अंतरिम दराचा व्यावसायिकाचे नामनुसार पत्ता पहाण्याचा दिवाळखोरी व्यावसायिकाचे नाव आणि नोंदणीकरण क्रमांक	श्री. नीरज तिवारी
नोंद. क्र.: IBBI/IPA-001/IP-P-02713/2022-23/14140
एएफए वैधता २२.०६.२०२४ पर्यंत
९.	संपर्काचाने नोंदणीकृत व्यावसायिकाचे, अंतरिम दराचा व्यावसायिकाचा पत्ता आणि ईमेल	पत्ता: २३-ए, २री मजला, बी. शिवाजी पार्क दॉमिनोस, लक्ष्मण टेरी, पश्चिम विहार, नवी दिल्ली-११००५३
ईमेल : gauravmittal.approfessional@gmail.com
१०.	अंतरिम दराचा व्यावसायिकांकडे पत्रव्यवहारासाठीचा पत्ता आणि ईमेल	पत्ता: २३-ए, २री मजला, बी. शिवाजी पार्क दॉमिनोस, लक्ष्मण टेरी, पश्चिम विहार, नवी दिल्ली-११००५३
ईमेल : gauravmittal.approfessional@gmail.com
११.	दावे सादर करण्याचा अंतिम दिनांक	०४.०४.२०२४
१२.	अंतरिम दराचा व्यावसायिकाने निश्चित शेषमाहितुसार दावाचा २१ दिवस उपलब्धता (६१) च्या उप क्र (a) अन्वये कर्जदाराची दावे, जर असल्यास.	कर्ज(नी)ची नाव: शून्य
१३.	वर्गवारीत धनकोंचे वर्गवारीत प्रतिनिधी म्हणून दावा पाठवावयाचा दरविभाग आणि दिवाळखोरी व्यावसायिकाचे नाव (प्रत्येक फार्मसेल वेगळा नमूने)	लागू नाही
१४.	(अ) संबंधित अर्ज आणि
(ब) अधिकृत प्रतिनिधीचा तपशील उपलब्ध आहेत:	(अ) वेबसाईट: https://ibbi.gov.in/home/downloads
(ब) लागू नाही

वाहारे: सुलभ देण्यात येते की, उद्घोषणा तयारी करावा व्यावसायिकाचा वारी दि. ०६.०६.२०२४ रोजी जेएमएस लॉजिस्टिक्स ॲण्ड एक्सप्रेस प्रायव्हेट लिमिटेडची कॉर्पोरेट दिवाळखोरीची अंतरिम दराचा व्यावसायिकाचे नोंद. क्र.: IBBI/IPA-001/IP-P-02713/2022-23/14140 वेबसाईट https://ibbi.gov.in/home/downloads वर उपलब्ध आहेत.

सही/-
श्री. नीरज तिवारी
दिनांक: ०६.०२.२०२४ — जेएमएस लॉजिस्टिक्स ॲण्ड एक्सप्रेस प्रायव्हेट लिमिटेडचे अंतरिम दराचा व्यावसायिक
ठिकाण: दिल्ली — नोंद. क्र.: IBBI/IPA-001/IP-P-02713/2022-23/14140